# रोजगार नसल्याने दोन तरुणांच्या आत्महत्या

अन्य घटनेत दोन महिलांचाही मृत्यू

लोकसत्ता टीम | April 27, 2020 02:17 am



(संग्रहित छायाचित्र)

## अन्य घटनेत दोन महिलांचाही मृत्यू

**यवतमाळ** : करोना संसर्गाच्या प्रतिबंधासाठी सुरू असलेली टाळेबंदी आता नागरिकांच्या जीववार बेतत आहे. यवतमाळ जिल्ह्यात रोजगार नसल्याने दोन तरुणांनी आत्महत्या करून जीवन संपवले. तर अन्य दोन घटनेत दोन विवाहित तरुणींचा मृत्यू झाला.

एकर शेतीत कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने तो मजुरी करायचा. गेल्या एक महिन्यापासून रोजगार नसल्याने घरातील पाच जणांसह कुटुंब कसे चालवायचे, या विवंचनेत तो होता. याच विवंचनेतून त्याने आत्महत्या केल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्याच्या पश्चात पत्नी, मुलगी, आई, वडील असा परिवार आहे. अन्य घटनेत घारफळ येथील प्रशांत मंगल ठाकरे (२४) या तरुणानेही टाळेबंदीमुळे रोजगार नसल्याने आलेल्या वैफल्यातून बुधवारी गळफास घेतला. तो पुण्यात एका कंपनीत होता. टाळेबंदीमुळे काम बंद झाल्याने तो गावी परत आला होता. भविष्यात काम मिळणार नाही, या चिंतेने त्याला ग्रासले होते. दोन्ही घटनांचा तपास बाभूळगाव पोलीस करीत आहेत.



JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?
X

आहेत. अशाच रांगेत पैसे काढण्यासाठी उभी असलेली एक महिला भोवळ येऊन पडल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना कळंब तालुक्यातील कोरेगाव (रामपूर) येथे शुक्रवारी घडली. भारती अरुण कुंटलवार (३०) असे मृत विवाहितेचे नाव आहे. प्रकृती ठिक नसतानाही ती कोरेगाव (रामपूर) येथील मिनी एटीएमवर पैसे काढण्यासाठी रांगेत उभी होती. त्यात भोवळ येऊन पडली. उपस्थित नागरिकांनी तिला तत्काळ रूंझा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तिथे तिचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत महिला रेल्वे कर्मचारी कर्तव्यावरून दुचाकीने परत येताना अपघात होऊन दगावली. रिया रुद्रांश पात्रे (२६) रा. नागपूर या चांदूर रेल्वे (जि. अमरावती) येथे पॉईंटमन म्हणून कार्यरत होत्या. टाळेबंदीमुळे रेल्वे बंद असल्याने त्या यवतमाळ येथे राहून चांदूर रेल्वे येथे ड्युटीवर जाणे-येणे करायच्या. शनिवारी दुचाकी (क्र. एमएच २९ एकएक्स ४६०८)ने चांदूर रेल्वे येथून ड्युटीवरून यवतमाळला परत येत असताना बाभूळगाव तालुक्यातील महमंदपूर नजीक त्यांची दुचाकी स्लीप झाली. त्यात डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.

***लोकसत्ता आता टेलीग्रामवर आहे. आमचं चॅनेल (@Loksatta) जॉइन करण्यासाठी येथे क्लिक करा आणि ताज्या व महत्त्वाच्या बातम्या मिळवा.***

ताज्या बातम्यांसाठी लोकसत्ताचे मोबाईल ॲप डाऊनलोड करा.

First Published on April 27, 2020 2:17 am

**Web Title:** Suicide Of Two Youths Due To Lack Of Employment Zws 70

## आणखी महत्त्वाच्या बातम्या


महाविकास आघाडीच ठरलं! विधान परिषद निवडणूक बिनविरोध होणार


१२ मे पासून मर्यादित मार्गांवर रेल्वे धावणार; उद्यापासून करता येणार तिकीट आरक्षण

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

मनोरंजन 1 of 5



JUST NOW! VIDEO: गिरिश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?




X

गर्लफ्रेण्डला भेटायला बिहारला जायचंय; बॉयफ्रेण्डच्या विनंतीवर सोनू सूद म्हणतो...







वेचक वेधक 1 of 9

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !





JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?

X

- SSC HSC Exam
- Tik Tok
- Jacinda Ardern
- Pimpri Chinchwad
- Facebook Shopes
- Salman Khan

More Loksatta

iPhone ePaper Facebook Twitter Android App
RSS You Tube

The Indian Express Group

The Indian Express
The Financial Express
Loksatta
Jansatta
Ramnath Goenka Awards
inUth

About Us | Contact Us | Privacy Policy | Feedback | Site Map

Copyright © 2020 The Indian Express [P] ltd. All Rights Reserved.



JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?

X